# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक : २५६०११८१-८२
फॅक्स : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई-मेल : regis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे-४११००७.

संदर्भ क्र. मीटा/359 दि. 07/03/2025

प्रति,

मा. प्राचार्य, संचालक, सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये/परिसंस्था

महोदय,

उच्च शिक्षण संस्थांमध्ये कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासंदर्भातील तक्रारींबाबत मध्यवर्ती केंद्र म्हणून she-box पोर्टल आणि सक्षम पोर्टलची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून आणि महाराष्ट्र शासनाकडून आदेश प्राप्त झाले आहेत.

१. मा. सर्वोच्च न्यायालयाने she-box पोर्टलची सुधारित आवृत्ती दिनांक २९.०८.२०२४ रोजी विकसित केली आहे. सदर she-box पोर्टल हे देशभरातील कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासंदर्भातील तक्रारींसाठी मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्यरत असणार आहे. या पोर्टलमुळे 'कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३' ह्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होईल. त्या विषयीचे शासन आदेशपत्र सोबत जोडले आहे.

   या सुधारित she-box पोर्टलवर (https://shebox.wcd.gov.in/) आपल्या महाविद्यालयाच्या समिती विषयक माहिती अपलोड करायची आहे. त्यामुळे एखादी तक्रार आपल्या संस्थेच्या संदर्भात असेल आणि ती she-box पोर्टलवर वर नोंदवली गेली असेल तर ती आपल्याकडे निर्गमित होऊ शकेल.

२. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सक्षम पोर्टल(saksham.ugc.ac.in) आणि UAMP पोर्टल(मुद्दा क्र. १६) (uamp.ugc.ac.in) त्यावरही आवश्यक माहिती अपलोड करण्यात यावी.

तरी कृपया आपल्या महाविद्यालयसंदर्भातील उपरोक्त माहिती संबंधित तीन पोर्टलवर त्वरीत अपलोड करावी आणि त्याचा अनुपालन अहवाल पुढील google फॉर्म लिंक (https://forms.gle/CyYMS7U5xFDfGTsB6) वर भरून सावित्रीबाई फुले विद्यापीठातील अंतर्गत समितीकडे ताबडतोब पाठवावा.

धन्यवाद.

प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे
प्रभारी कुलसचिव